| | |
|---|---|
| MHRG100006802020 | **फौजदारी चौकशी अर्ज क्र.३०७/२०२०**<br>**श्रीमती पुष्पलता मल्लीकार्जुना मुद्दीसेट्टी व १**<br>**विरुध्द**<br>**श्री. मल्लीकार्जुना रामासुबय्या मुद्दीसेट्टी** |

## निशाणी क्र.५ खालील आदेश

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम २३ प्रमाणे अंतरिम संरक्षणात्मक आदेश व अंतरिम पोटगी मिळण्याकरिता दाखल केला आहे.

०२. अर्जदारातर्फे विद्वान वकील श्रीमती प्रिती जंगम व सामनेवालातर्फे विद्वान वकील श्री. आदित्य भाटे यांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर प्रस्तुत कामी अंतरिम अर्जाच्या निर्णयाकामी खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यांची कारणमीमांसा पुढीलप्रमाणे केलेली आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार असे शाबीत करते काय की, सामनेवाला यांनी तिच्यावर कौटूंबिक हिंसाचार केला ? | होकारार्थी. |
| २ | अर्जदार ही स्वतःचे पालनपोषण करण्यास असमर्थ आहे काय ? | होकारार्थी. |
| ३ | अर्जदार ही कौटूंबिक कायद्याच्या कलम १८ प्रमाणे संरक्षणात्मक दाद मिळण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी. |
| ४ | अर्जदार सामनेवाला कडून दरमहा रक्कम रुपये २०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये वीस हजार) पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशतः होकारार्थी. |
| ५ | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

०३. उभय बाजुंना मान्य असलेली कथने पुढीलप्रमाणे

अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह दिनांक २२/०५/२००२ रोजी झाला व सदर विवाहसंबंधातुन अर्जदार क्र.२ याचा जन्म झाला या गोष्टी उभय बाजुंना मान्य आहेत.

**मुद्दा क्र.१ बाबतः–**

०४. अर्जदार हिच्या कथनानुसार ती नोकरी करीत असताना सामनेवाला हा तिला अश्लील प्रश्न विचारत होता, तिची शारिरीक तपासणी करीत होता व तिच्या चारित्र्यावर संशय घेत होता. सामनेवाला हा त्रास देत असल्यामुळे अर्जदाराने नोकरी सोडली. सन २०१८ पासुन सामनेवाला हा तिच्याशी बोलत नव्हता. सन २०२० मध्ये अर्जदार ही तिच्या भावाच्या घरी महाड येथे येऊन अर्जदार क्र.२ सोबत राहत आहे. तेव्हापासुन सामनेवाला याने अर्जदार क्र.१ हिस नांदावयास नेले नाही अथवा अर्जदार क्र.१ व २ यांच्या आवश्यक गरजांसाठी आर्थिक तरतुद केली नाही. म्हणुन अर्जदार हिने सामनेवालाविरुध्द संरक्षणात्मक आदेश व अंतरिम पोटगी मिळण्यासाठी सदरचा अर्ज दिला आहे.

०५. सामनेवाला याने मुळ अर्जातील व अंतरिम अर्जातील मान्य असलेल्या मजकुराव्यतिरिक्त उर्वरित मजकुर नाकारलेला आहे. त्याच्या कथनानुसार अर्जदार ही हेकेखोर स्वभावाची आहे व वाद घालते. अर्जदार क्र.१ हिने स्वतःहुन सामनेवाला याचा त्याग केला आहे. सामनेवाला हा रोजंदारी करतो. त्याच्यावर त्याच्या आई–वडिलांची जबाबदारी आहे. सबब, त्याने सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०६. पती या नात्याने पत्नी व मुलाचे संगोपन करणे हे पतीचे कायदेशीर व सामाजिक कर्तव्य आहे. अर्जदार क्र.१ स्वतः व अर्जदार क्र.२ या मुलाच्या अत्यावश्यक गरजांकरिता सुध्दा तिच्या भावावर अवलंबुन आहे. सामनेवाला याने अर्जदार क्र.१ व २ यांच्या अत्यावश्यक गरजांकरिता कोणतीही आर्थिक तरतुद केल्याचे दिसुन येत नाही. सदरची बाब कौटूंबिक हिंसाचार या संज्ञेत मोडते. त्याचप्रमाणे सामनेवाला अर्जदार क्र.१ हिच्या चारित्र्यावर संशय घेउन तिला अश्लील प्रश्न विचारत होता व तिची शारिरीक तपासणी करीत होता. अर्जदार क्र.१ हिने ऑनलाईन ऑर्डर करुन फॅन मागविला होता. तो फॅन घरी आणण्यासाठी शेजारच्या माणसाची मदत अर्जदार क्र.१ हिने मागितली. त्या माणसाशी अर्जदार क्र.१ बोलत असताना पाहुन संशय घेउन सामनेवाला यांनी अर्जदार क्र.१ हिला मारहाण केली. त्यावेळी अर्जदार हिने १८१ हेल्पलाईन नंबरवरुन पोलीसांना फोन केला. तेव्हा पोलीसांनी सामनेवाला यास समज दिली. सामनेवाला याची वर नमुद वागणुक ही शारिरीक व मानसिक हिंसाचार या संज्ञेत मोडते. सबब, मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात येतो.

**<u>मुद्दा क्र.२ बाबतः-</u>**

०७. अर्जदार ही कमाविती नाही. तिच्या कथनानुसार ती सध्या महाड येथे तिच्या भावाकडे राहते. तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तिच्यावर अर्जदार क्र.२ या मुलाची देखील जबाबदारी आहे व तो सध्या शिक्षण घेत आहे. त्याच्या शिक्षणाकरिता सध्या अर्जदार क्र.१ हिस तिच्या भावावर अवलंबुन रहावे लागत आहे. अर्जदार क्र.१ व सामनेवाला मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे उत्पन्नाबाबत त्यांचे शपथपत्र निशाणी क्र.१८ व २१ कडे दाखल केले आहे. अर्जदार हिने स्वतःच्या

उत्पन्नाच्या शपथपत्रामध्ये तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याचे नमुद केले आहे. सामनेवाला याने त्याच्या उत्पन्नाच्या शपथपत्रामध्ये तो रोजंदारीचे काम करतो व त्याच्यावर त्याच्या वृध्द आई–वडिलांची जबाबदारी आहे. संरक्षण अधिकारी यांनी सामनेवालाच्या आर्थिक उत्पन्नाबाबतचा आर्थिक पाहणी अहवाल निशाणी क्र.१३ सोबत हजर केला आहे. त्यामध्ये असे नमुद केले आहे की, सामनेवाला याचा गणेशपुरा, ता. कडी, जि. महेसाना, राज्य गुजरात या ठिकाणी श्री. साई बालाजी नर्सरी या नावाचा व्यवसाय आहे व त्यासोबत त्यांनी सामनेवाला याचा बचत खात्याचा उतारा हजर केला आहे. त्यावरुन सामनेवालाहा कमावत असल्याचे दिसुन येते व त्याच्याकडे उत्पन्नाचे साधन असल्याचे दिसुन येते.

०८. मा. सर्वोच्च न्यायालयाने **<u>राजनेश विरुध्द नेहा व इतर फौजदारी अपील क्र.७३०/२०२० मधील दिनांक ०४/११/२०२० चा निकाल</u>** या खटल्यामध्ये अंतरिम व कायमची पोटगी रक्कम ठरविताना कोणकोणत्या गोष्टींचा विचार होणे आवश्यक आहे याबाबत निर्देश दिलेले आहेत. सदर निर्देशांनुसार पोटगीची रक्कम निर्धारित करताना न्यायालयाने पत्नी व मुलांच्या आवश्यकतेनुसार उभय पक्षकारांचे राहणीमान, शैक्षणिक पात्रता, अर्जदाराचे स्वतःचे उत्पन्न व सामनेवाला यांचे स्वतःचे उत्पन्न या गोष्टींचा विचार करणे गरजेचे असते असे नमुद केलेले आहे. सबब, उभय पक्षकारांचे राहणीमान, शैक्षणिक पात्रता, उभय पक्षकारांचे उत्पन्नाचे साधन व अर्जदार क्र.२ हा शिक्षण घेत आहे या बाबीचा विचार करता सामनेवाला याने अर्जदार क्र.१ व २ यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रुपये ५,०००/– (अक्षरी रक्कम रुपये पाच हजार) पोटगी देणे न्यायोचित होईल.

०९. मा. सर्वोच्च न्यायालयाने **राजनेश विरुध्द नेहा व इतर फौजदारी अपील क्र.७३०/२०२० मधील दिनांक ०४/११/२०२० चा निकाल** या खटल्याकामी असे निर्देश दिले आहेत की, अंतरिम पोटगीची रक्कम ही अर्जदारांनी अर्ज दिलेल्या तारखेपासुन द्यावी. तसेच सदर अर्जाच्या खर्चापोटी सामनेवाला यांनी अर्जदार हिस रक्कम रुपये ३,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन हजार) देणे न्यायाचे होईल. सबब, मुद्दा क्र.४ च्या निष्कर्षासाठी मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला यांनी अर्जदार क्र.१ व २ यांना कोणत्याही प्रकारचा शारिरीक व मानसिक त्रास देउ नये असा अंतरिम संरक्षणात्मक आदेश देण्यात येतो.

३. सामनेवाला यांनी अर्जदार क्र.१ व २ यांना अर्ज दाखल तारखेपासुन प्रत्येकी दरमहा रक्कम रुपये ५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पाच हजार) इतकी पोटगी सदर निकालाच्या तारखेपासुन देण्यात यावी.

४. सामनेवाला यांनी अर्जदार हिस सदर अर्जाच्या खर्चाची म्हणुन रक्कम रुपये ३,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन हजार) सदर आदेशाच्या तारखेपासुन १ महिन्याच्या आत द्यावी.

५. अर्जदार यांनी सदरचा खटला लवकरात लवकर चालवावा अन्यथा अंतरिम आदेश रद्द करण्यात येईल.

६. सदर आदेशाची प्रत संबंधित पोलीस ठाणे, प्रभारी अधिकारी व संरक्षण अधिकारी यांना पाठविण्यात यावी.

७. सदर आदेशाची प्रत उभय पक्षकारांना मोफत देण्यात यावी.

सही/-

महाड
दिनांक – ०४/०६/२०२२

(**एस. एस. पाटील**)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, महाड